# पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाची कहाणी

लेखक : विल ड्युरँट
अनुवाद – साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

**पाश्चिमात्त्य तत्त्वज्ञानाची कहाणी : साने गुरुजी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**द्वितीय आवृत्ती**
मार्च, २०१२

**किंमत**
रुपये ५७०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

## प्रस्तावना

तत्त्वज्ञानाचे उपयोग : तत्त्वज्ञानात एक प्रकारचे सुख आहे. अध्यात्माच्या मृगजळातही एक प्रकारची मोहिनी आहे. एक प्रकारचे आकर्षण आहे. तत्त्वज्ञानाच्या प्रत्येक विद्यार्थ्याला या गोष्टीचा अनुभव येतो; परंतु शेवटी विचाराच्या अत्युच्च शिखरावरून मनुष्य रोजच्या रामरगाड्यात येतो. विद्यार्थीदशा संपूर्ण संसारात चालू राहते. या भौतिक जीवनाच्या शेकडो गरजा तत्त्वजिज्ञासूला खाली खेचतात. प्रत्येकाच्या जीवनात एकेकदा वसंत ऋतू येऊन जातो. त्यावेळेस आपणास तत्त्वज्ञान प्रिय वाटत असत. प्लेटो तत्त्वज्ञान म्हणजे 'प्रियतम आनंद' असे म्हणे. आपणा सर्वांच्या अनुभवाला ही गोष्ट जीवनाच्या वसंत ऋतूत येते. त्यावेळेस-ज्यावेळेस जीवनात सोनेरी सूर्यप्रकाश सर्वत्र पसरलेला असतो. या विनयशील चकविणाऱ्या सत्याच्या मागोमाग जाण्यात आपणास कृतार्थ वाटत असते. या देहाच्या सुखोपभोगांपेक्षा, या तुच्छ सांसारिक जीवनात गढून जाण्यापेक्षा हाती न सापडणारे, आपणास हुलकावणी दाखवणारे सत्याचे, तत्त्वज्ञानाचे जे मोहक रूप, त्यापाठीमागे जाण्यात आपणास पुरुषार्थ वाटतो आणि ती वासंतिक वेळ जरी निघून गेली, संसाराच्या फेऱ्यात जरी आपण गुरफटलो, तरीही आधीची प्रज्ञानाचा अनुनय करणारी जी भूक, जी ती उत्कट इच्छा, तिच्या उत्कंठेचा काहीतरी अंश सदैव शिल्लक असतोच. ज्ञानाला वरण्याची आपली इच्छा काही सर्वस्वी मरत नाही.

इंग्लंडमधील थोर कवी ब्राऊनिंग म्हणतो त्याप्रमाणे आपणही म्हणतो की, ''जीवनाला अर्थ आहे. तो अर्थ शोधून काढणे म्हणजेच माझे खाणे-पिणे होय.'' आपल्या जगण्यातील कितीतरी भाग निरर्थक वाटतो. आपण चंचल असतो. आपण आपणास पुसून टाकीत असतो. आपल्याला धरसोडीमुळे, चांचल्यामुळे आपले खरे स्वरूप काय तेच कळत नाही, परंतु माझ्या प्रश्नांना उत्तर मिळावे, माझी जिज्ञासा शांत व्हावी ही मला इच्छा आहे. या सर्व सतत बदलणाऱ्या व नष्ट होणाऱ्या क्षणभंगुर पसाऱ्याचे मूल्य समजून घेण्याची आपणास इच्छा असते. रोजच्या चाकोरीतून स्वत:ला ओढून घ्यावे, भोवऱ्यातून बाहेर यावे अशी मनात असोशी असते. लहान वस्तू लहान, महान वस्तू महान हे वेळीच समजावे असे वाटत असते. 'अनंततेच्या प्रकाशात' नित्य जशा दिसतील तशा पाहाव्या असे आपणास वाटत असते. चिरकालीन सत्याच्या प्रकाशात या सर्व आसमंतातल्या गोष्टींना जे मूल्य असते ते समजून घेण्याची आपणास

इच्छा असते. त्या मापाने हे सर्व मापावे असे वाटते. जे अपरिहार्यच आहे त्याच्या समोर हसण्याची, मृत्यू समोर दिसत असला तरी हसण्यास शिकण्याची आपणास इच्छा असते. आपणास पूर्ण व्हावेसे वाटते. आपल्या वासनांमध्ये मेळ घालून त्याचे नीट परीक्षण, निरीक्षण होत नाही. आपण अर्थशून्य असतो. सारे व्यर्थ वाटते व दिसते. उगीच खटाटोप. मनात व बाहेर जगात सारा गोंधळच गोंधळ दिसतो.

या गोंधळाशी आपण झगडत असतो पण ही आपली धडपड चालू असताना हृदयाच्या आतील भागात सतत अशी एक श्रद्धा वसत असते की आपणामध्ये काहीतरी चिन्मय व महत्त्वाचे असले पाहिजे. आपणाला जर आपल्या मताचा, आपल्या आत्म्याचा उकल करता आला तर काहीतरी मोलाचे हाती लागेल, हे आपणास समजून घेण्याची इच्छा असते. जर्मन तत्त्वज्ञानी नित्शे म्हणे, ''जीवन म्हणजे जे जे आपण आहो व जे जे आपणाला भेटते त्या सर्वांचे प्रकाशात आणि ज्योतीत परिवर्तन करणे; स्वत:ला व स्वत:भोवतीच्या वस्तुपात्राला तेजोमय करणे, ज्योतिर्मय करणे.''

The Brothers Karama Zov या कादंबरीतील एक भाऊ मिटिया म्हणतो, '' लक्षाधीश होण्याची इच्छा करून आपल्या सर्व कर्तृत्वशक्तीला वारेमाप न दवडता व्यवस्थित रीतीने वापरण्याची आपणास इच्छा असते. नितिशास्त्र व राजकारण, कदाचित तर्कशास्त्र व सद्वस्तुशास्त्रही, यांची परिणती सुसंघटित उत्साहशक्तीत होईल. आपल्या सर्व कार्यशक्तीला, आपल्यातील उत्साहाला व्यवस्थित स्वरूप देणे हीच या सर्व शास्त्रांची इत्यर्थता.''

अमेरिकन द्रष्टा थोरो म्हणे, ''तत्त्वज्ञानी होणे म्हणजे सूक्ष्म विचार जवळ असणे नव्हे, किंवा एखादा पंथ किंवा संप्रदाय स्थापणे नव्हे; तर प्रज्ञानावर अमाप प्रेम करणे व तद्नुरूप वागणे. साधे, स्वतंत्र, उदार व श्रद्धेचे जीवन जगणे होय.'' जर आपणाला एखादे सत्य, प्रज्ञान गवसले म्हणजे बाकीच्या वस्तू आपोआप येतील अशी खात्री यायला हरकत नाही. मुख्य गोष्ट म्हणजे परिणत प्रज्ञा, नि:शंक ज्ञान, जीवनाचे ज्ञान. बेकन बजावतो की, प्रथम मनाच्या मंगल गोष्टी शोधा. त्या मिळवल्या म्हणजे उरले सुरले आपोआप मिळेल. किंवा ते न मिळाले तरीही त्याची खंत वाटणार नाही. सत्य आपणास श्रीमंत नाही करणार, परंतु मुक्त मात्र करील.

एखादा असभ्य वाचक रागावून म्हणेल, ''पुरे करा तत्त्वज्ञानाचे गोडवे. बुद्धिबळाच्या खेळाप्रमाणे ते निरुपयोगी आहे. अज्ञानाइतके ते दुर्बोध आहे. भांड्यात भरून ठेवलेल्या वस्तूप्रमाणे ते साचीव आहे.'' सिसेरो म्हणे, ''जगातील सारी व्यस्तता जर कोठे पाहावयाची असेल तर ती तत्त्वज्ञानाच्या ग्रंथातून बघावयास मिळेल.'' होय. ही गोष्ट खरी आहे की, पुष्कळशा तत्त्वज्ञानांना व्यवहारज्ञानाव्यतिरिक्त इतर सर्व प्रकारचे शहाणपण असते. व्यवहाराच्या गर्दीतून वरच्या विरळ हवेत उड्डाण करण्याची कुवत होती म्हणूनच त्यांना तत्त्वज्ञानाच्या प्रांतात बऱ्याचशा भराऱ्या मारता आल्या. आपण जी ही तत्त्वज्ञानाची सफर करणार आहोत, त्या सफरीत जेथे प्रकाश असेल त्या बंदरात आपण शिरूया. सद्वस्तुशास्त्राच्या गढूळ व गदळ प्रवाहात आपण जायचे नाही. ईश्वरशास्त्राच्या वाचाळतेच्या वादात आपण घुसायचे नाही. परंतु तत्त्वज्ञान का साचीव आहे? विज्ञान तर उत्तरोत्तर वाढत आहे आणि तत्त्वज्ञान अशा प्रश्नांचा उहापोह करण्याचे अवघड व दुर्गम कार्य अंगावर घेते की जे प्रश्न शास्त्रीय पद्धतीला बंद आहेत. शास्त्रीय पद्धतीने ज्या प्रश्नांचा शोधबोध घेता येत नाही असे शिव व अशिव, सौंदर्य व कुरूपता, व्यवस्था व स्वातंत्र्य, जीवन व मरण हे प्रश्न कोणत्या प्रयोगालयात सोडवणार? जेव्हा एखादे संशोधनाचे क्षेत्र अचूक मापनास योग्य असे देऊ लागते तेव्हा त्याला आपण शास्त्र किंवा विज्ञान म्हणतो.

प्रत्येक विज्ञानाचा आरंभ तत्त्वज्ञानाने होतो व त्याचा शेवट कलेत होतो. काही गृहीत कल्पनांतून त्याचा जन्म होतो व शेवटी प्रत्यक्ष सिद्धीत त्याची परिणती होते. तत्त्वज्ञान म्हणजे अज्ञानासंबंधीच्या गृहीत कल्पना होय. (जसे सद्वस्तुशास्त्रात असते) किंवा ते अस्पष्ट ज्ञान असलेल्या गोष्टीविषयी गृहीत कल्पना असते. (जसे नीतिशास्त्रात किंवा राजकीय तत्त्वज्ञानात असते.) सत्याच्या किल्ल्यावर हल्ला चढवताना तत्त्वज्ञान पहिल्या खंदकात असते. विज्ञान म्हणजे जिंकून घेतलेला प्रदेश होय. विज्ञानाने जिंकून घेतलेल्या प्रदेशामागे असलेल्या सुरक्षित प्रदेशात ज्ञानविज्ञान व कला ही आपले अपूर्ण, परंतु आश्चर्यकारक असे जग उभारीत असतात. तत्त्वज्ञान मात्र गोंधळलेल्याप्रमाणे उभे आहे, असे दिसते. सृष्टी व या वस्तू जशा आहेत, जशी त्यांची कार्ये चालतात ते समजण्यापुरते विज्ञान आपले कार्य मर्यादित करीत असते.

टर्जिनॉव्हच्या कवितेतल्याप्रमाणे वैज्ञानिक हा सृष्टीप्रमाणेच नि:पक्ष असतो. एखाद्या घुंगुरट्याच्या पायाचे परीक्षण करणे असो किंवा अलौकिक विभूतीची निर्मात्री वेदना असो, दोन्ही गोष्टींत त्याला सारखीच गोडी वाटते. परंतु तत्त्वज्ञानी वस्तूंचे वर्णन करून समाधान नाही मानीत. सर्वसामान्य अनुभवाशी त्या गोष्टींचा संबंध काय हे तो जाणू इच्छितो आणि या घडामोडीचा अर्थ व त्यांचे मूल्य जाणू इच्छितो. सर्व वस्तूंना एकत्र जोडून तो त्यांचा संश्लेषक अर्थ लावू पाहतो. या सर्व तुकड्यांतून काही मेळ शोधू बघतो. अज्ञाताचा शोध करायला, जेथे कोणी गेले नाही तेथे जायला तो पुन्हा कंबर बांधतो. एक प्रकारचे दिव्य असमाधान तत्त्वज्ञान्याजवळ असते.

अधिक शास्त्रीय परिभाषेत बोलायचे झाले तर असे म्हणता येईल की, विज्ञान म्हणजे पृथक्करणात्मक वर्णन, तर तत्त्वज्ञान म्हणजे संश्लेषण करणारे विवेचन असते. विज्ञान हे एकाचे त्याच्या अनेक भागात पृथक्करण करू इच्छिते. अवयवीचे अवयव ते अलग करते, जे अज्ञात आहे ते ज्ञात करते. वस्तूंचे मूल्यमापन विज्ञान करीत नाही. या वस्तूंचे अंतिम ध्येय काय, यांच्यातून काय होणे शक्य आहे, याचा विचार करीत ते बसत नाही. त्यांचे एकंदरीने अंतिम महत्त्व काय आहे, या संपूर्ण विश्वरचनेत त्यांचे कोणते स्थान आहे याची चर्चा विज्ञान करीत नाही. या वस्तू त्या क्षणी कशा आहेत तेवढेच विज्ञान दाखवून गप्प बसते. जे विश्वाचे घड्याळ जिज्ञासू वैज्ञानिक खोलून ठेवतो, त्याचे भाग एकत्र जोडून तत्त्वज्ञ पुन्हा नीट बसवून बघतो. पूर्वीपेक्षा अधिक चांगल्या रीतीने त्याचा अर्थ लावून पाहतो. विज्ञान कसे बरे करावे व कसे मारावे ते सांगते. विज्ञान किरकोळ मृत्युसंख्या कमी करते व मग लढाईत घाऊक पद्धतीने मारते. परंतु सर्व अनुभवाच्या प्रकाशात सुसंबद्ध केलेली इच्छा म्हणजेच पिकलेले ज्ञान किंवा शहाणपण होय; या परिपक्व ज्ञानानेच केव्हा बरे करावे व केव्हा मारावे ते आपणास कळते. प्रक्रिया पाहणे व साधने तयार करणे म्हणजे विज्ञान; परंतु सर्व हेतूंची व उद्दिष्टांची छाननी करून सर्व उद्दिष्टांचा मेळ घालणे म्हणजे तत्त्वज्ञान होय. परंतु आजकाल साधने व उपकरणे यांची कल्पनातीत वाढ झाली आहे आणि ध्येये व उद्दिष्टे यांचे विशदीकरण हळूहळू चालले आहे. यामुळे आज आपल्या जीवनात आदळआपटच फार, गदारोळ फार. त्याचा अर्थ मात्र त्याला उमगत नाही. वस्तूला किंवा घडामोडीला तेव्हाच अर्थ प्राप्त होतो, जेव्हा तिचा आपल्या इच्छेशी संबंध येतो.

एका ध्येयाशी संबद्ध असल्याशिवाय, एखाद्या हेतूसाठी म्हणून ती गोष्ट असल्याशिवाय तिला महत्त्व येत नाही. समग्राशी या असंख्य घडामोडींचा संबंध जर नसेल, या सर्व विस्कळीत गोष्टींचा काहीएक संपूर्णतेशी संबंध नसेल तर त्यांना अर्थच राहात नाही. तत्त्वज्ञानाशिवाय विज्ञान, मूल्यमापनाशिवाय व विशिष्ट दृष्टीशिवाय घडणाऱ्या या घडामोडी, या आपणास तारणार नाहीत. ही जी निराशा आहे, हा जो हलकल्लोळ उडाला आहे त्यातून आपण तत्त्वज्ञानाशिवाय वाचू शकणार नाही. विज्ञान आपणास ज्ञान, पांडित्य देते, परंतु परिणतप्रज्ञत्व तत्त्वज्ञानानेच लाभू शकेल.

विशेष करून तत्त्वज्ञानात पाच क्षेत्रांचा अभ्यास व विवेचन येते. तर्कशास्त्र, सौंदर्यशास्त्र, नीतिशास्त्र, राज्यशास्त्र आणि सद्वस्तुशास्त्र या पाच क्षेत्रांचा तत्त्वज्ञानात अंतर्भाव होतो. तर्कशास्त्र किंवा न्यायशास्त्र हे विचार व संशोधन करण्याची आदर्श पद्धती आहे. निरीक्षण–अंतर्निरीक्षण विगमन व निगमन, अभ्युपगम व प्रयोग, विश्लेषण व संश्लेषण अशा प्रकारच्या ज्या मानवी कृती त्यांचा अभ्यास तर्कशास्त्र करते. मानवाच्या या प्रकारच्या ज्या हालचाली त्या समजून घेऊन मार्गदर्शन करणे हे तर्कशास्त्राचे काम. आपणापैकी पुष्कळांना हा अभ्यास, हे शास्त्र, नीरस वाटते. परंतु आपण हे विसरता कामा नये की मानवाने विचार करण्याच्या पद्धतींत संशोधनाच्या रीतींत ज्या सुधारणा केल्या त्यामुळे इतिहासातील महत्त्वाच्या गोष्टी घडल्या आहेत. सौंदर्यशास्त्र म्हणजे आदर्श रूपाचा अभ्यास, सौंदर्याचा अभ्यास; हे कलेचे तत्त्वज्ञान होय. नीतिशास्त्र म्हणजे आदर्श वागणुकीचे शास्त्र; सॉक्रेटिस म्हणे की, ज्ञान, चांगले काय व वाईट काय याचे ज्ञान म्हणजे परमश्रेष्ठ ज्ञान, जीवनातील शहाणपणाचे ज्ञान. राज्यशास्त्र म्हणजे आदर्श समाजरचनेचे ज्ञान. (राजशासन म्हणजे अधिकाराच्या जागा बळकावणे व त्या हाती ठेवू बघणे असा अर्थ काही करतात तो नव्हे.) शासनाच्या तत्त्वज्ञानाच्या नाटकात राजेशाही, नबाबशाही, लोकशाही, समाजवाद, अराजकवाद, स्त्रियांची समान हक्कांची चळवळ वगैरे भूमिका आहेत आणि शेवटी येते सद्वस्तुशास्त्र. यात फारच त्रास व दगदग, कारण तत्त्वज्ञानातील इतर वर सांगितलेल्या शास्त्रांप्रमाणे आदर्शाच्या प्रकाशात प्रत्यक्षाची जुळणी करण्याचा प्रयत्न येथे नसतो, तर सर्वच वस्तूंच्या अंतिम स्वरूपाचा येथे अभ्यास असतो. या सर्व वस्तुजाताचा अर्थ काय ते तत्त्वज्ञान शोधू पाहते. जडद्रव्याच्या वास्तव आणि अंतिम स्वरूपाचा अभ्यास करणारे ते ‘सत्ताशास्त्र’ असते. मनाचा अभ्यास करणारे ‘तात्त्विक मानसशास्त्र’ असते. संवेदन आणि जाणणे या प्रक्रियांत मन आणि जडद्रव्य यांच्या परस्परसंबंधाचा अभ्यास केला जातो. या सर्वांचा अंतर्भाव सद्वस्तुशास्त्रात होत असतो.

तत्त्वज्ञानाचे हे असे भाग आहेत. परंतु तत्त्वज्ञानाचे असे अलग तुकडे करू तर आपण सारे सौंदर्य व आनंद गमावून बसू. या ग्रंथात आपण तत्त्वज्ञानाचा तर्ककठोर असा अमूर्त नीरस अभ्यास नाही करायचा हे... सुरकुतलेले तत्त्वज्ञान नव्हे. थोर विभूतींच्या स्वरूपात मूर्त झालेले जिवंत तत्त्वज्ञान आपण पाहू. आपण केवळ तत्त्वज्ञानाचाच अभ्यास नाही करायचा तर तत्त्वज्ञान्यांचाही अभ्यास करू. विचारांचे थोर हुतात्मे व संत यांच्या संगतीत आपण राहू; त्यांची प्रभा आपण आपल्या भोवतीही खेळू देऊ. आणि कदाचित त्यांची ती प्रभावी तेजस्वी वृत्ती थोडीफार आपणातही येईल. लिओनार्डो ‘परमोच्च सुख म्हणजे समजून घेण्याचे, जाणून घेण्याचे सुख’’ असे जे म्हणतो त्यात आपणही रमू. प्रत्येक तत्त्वज्ञान्याजवळ आपणास काही ना काही नवे शिकविण्यासारखे आहे. मात्र आपण नीट, योग्य रीतीने त्याच्याजवळ जावयास पाहिजे.

इमर्सन विचारतो, ''खरा जिज्ञासू कोण? खरा जो ज्ञानार्थी आहे, त्याचे रहस्य कशात आहे? खरा ज्ञानार्थी म्हणतो की प्रत्येकात असे काहीतरी आहेच की जे मी शिकेन; आणि तेवढ्यापुरता मी त्याचा शिष्य व तो माझा गुरू.'' हीच दृष्टी घेऊन इतिहासातील महामुनींजवळ आपण जाऊया आणि या इमर्सननेच अन्यत्र एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे आपणही म्हणूया की, या थोर विभूती जे सांगतात त्याचा अस्पष्ट अनुभव आम्हालाही आला होता असे आम्हाला अंधुक आठवते. आमच्या त्या गतकालातील तारुण्यात हेच विचार आमच्याही मनात होते असे वाटते. आमच्याच मनातील गोष्टी हे तत्त्वज्ञानी बोलत आहेत. आमचे विचार प्रकट करण्याचे धैर्य किंवा कला आमच्याजवळ नव्हती. ते विचार शब्दात आम्हाला मांडता येत नव्हते.'' असे वाटण्यात एक प्रकारची अहंतृप्ती आहे असे कोणी म्हणेल; परंतु खरे पाहिले तर आपले कान व आपले आत्मे जितके ऐकू शकतील तितके ते महात्मे आपणाजवळ बोलतात. त्यांच्यामध्ये ज्याला फुले आली आहेत, त्याची आपणामध्ये जितकी मुळे असतील त्या मानानेच, ते आपणाजवळ बोलतील, चालतील. महात्म्यांना जे अनुभव आले ते आपणासही आले परंतु त्यांनी त्या अनुभवांतून जेवढे शोषून घेता येईल तेवढे घेतले. त्यातील त्यांनी सारे शोषून घेतले. आपण तसे केले नाही. त्या अनुभवांतील रहस्य, त्यातील सूक्ष्म अर्थ, नाना छटा यांचा पुरापुरा आस्वाद आपण घेतला नाही. आपल्या भोवती ही अनंत सृष्टी गुणगुण करीत आहे. परंतु ती गुणगुण ऐकण्याइतकी आपली कर्णेंद्रिये सूक्ष्म व दक्ष नाहीत. प्रज्ञावंत ही आसमंतातील गुणगुण ऐकतो, तो अनंत सृष्टीतील संगीत ऐकतो, ताऱ्यांचे गाणे ऐकतो. पायथागोरस म्हणतो की, ''तत्त्वज्ञान म्हणजे परमोच्च संगीत.'' या म्हणण्याचा थोर प्रज्ञावंत पुरुषांना अनुभव येतो.

चला तर मग. या महापुरुषांजवळ जाऊन ते काय म्हणतात ते ऐकूया. त्यांच्याकडून झालेल्या क्षणभंगुर चुका आपण विसरून जाऊया आणि जे धडे शिकवायला ते उत्सुक आहेत, ते धडे त्यांच्या पायांशी बसून घेऊया. सॉक्रेटिस क्रिटोला म्हणाला, ''विचारपूर्वक नीट वाग. तत्त्वज्ञानाचे आचार्य स्वत: चांगले आहेत की वाईट आहेत इकडे लक्ष नको देऊ. तू फक्त तत्त्वज्ञानाचा विचार कर. नीट, सम्यक् रीतीने त्या तत्त्वज्ञानाचे परीक्षण कर. जर ते तत्त्वज्ञान दुष्ट वाटले तर सर्व लोकांना त्यातून परावृत्त करण्याचा प्रयत्न कर; परंतु ते जर चांगले असेल– जसे मला वाटते– तर तत्त्वज्ञानाच्या मागोमाग जा. तत्त्वज्ञानाची सेवा कर व आनंद मान.''

✦✦✦

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ❍ प्रकरण एक | प्लेटो | ११ |
| ❍ प्रकरण दोन | ॲरिस्टॉटल व ग्रीक शास्त्रे | ६५ |
| ❍ प्रकरण तीन | फ्रॅन्सिस बेकन | ११५ |
| ❍ प्रकरण चार | स्पिनोझा | १६९ |
| ❍ प्रकरण पाच | व्हॉल्टेअर आणि फ्रेंच प्रबोधन | २२६ |
| ❍ प्रकरण सहा | इमॅन्युअल कान्ट व जर्मन चिद्वाद | २८३ |
| ❍ प्रकरण सात | शोपेनहॉवर (Schopenhauer) | ३३६ |
| ❍ प्रकरण आठ | हर्बर्ट स्पेन्सर (Herbert Spencer) | ३९० |
| ❍ प्रकरण नऊ | फ्रीड्रिश नीत्शे | ४४१ |
| ❍ प्रकरण दहा | समकालीन युरोपियन तत्त्वज्ञ (बेर्गसों, क्रोचे व बर्ट्रांड रसेल) (Bergson, Croce, Bentrand Russel) | ४९२ |
| ❍ प्रकरण अकरा | समकालीन अमेरिकन तत्त्वज्ञ (सन्तायना, जेम्स, ड्यूई) (Santayana, James, Dewey) | ५३४ |


या ग्रंथात एकूण अकरा प्रकरणे असून त्यामध्ये एकशे अडतीस उपविभाग आहेत.

✦✦✦

# प्रकरण एक : प्लेटो

**१. प्लेटोचा संदर्भ :**

युरोपच्या नकाशाकडे नजर फेका. भूमध्य समुद्रात आपली वाकडी बोटे लांबवणारा ग्रीसचा कृश हात तुम्हाला दिसेल. ग्रीसच्या दक्षिणेस महान क्रीट बेट आहे. या बेटापासून ख्रिस्तपूर्वीच्या दुसऱ्या सुवर्णयुगात संस्कृती व सुधारणा यांना आरंभ झाला. त्याला ग्रीसच्या देशाने घट्ट पकडून जिंकून घेतले. या बेटापासूनच ख्रिस्तपूर्व दुसऱ्या सुवर्णयुगात ग्रीसने संस्कृती–सुधारणा यांना पकडून हस्तगत केले. पूर्वेकडे ईजिप्त समुद्राचे पलीकडे आशिया मायनर आहे. आशिया मायनर आज शांत व स्वस्थ दिसले तरी एके काळी ते चैतन्याने मुसमुसत होते. प्लेटोच्या पूर्वकाळात उद्योगधंदे, व्यापार व मुक्त विचार या सर्वांनी आशिया मायनर चैतन्याने सळसळत होते. पश्चिमेस पलीकडे इटली उभा आहे. तो जणू समुद्रातील स्तंभ, झुलता मनोरा आहे आणि सिसिली व स्पेनही पश्चिमेसच आहेत. या भागांतून ग्रीकांच्या भरभराटीस आलेल्या वसाहती होत्या आणि सर्वांच्या पलीकडे ज्याला आपण जिब्राल्टर म्हणतो ते हर्‌क्युलिसचे खांब उभे आहेत. जिब्राल्टरच्या भव्य भीषण जबड्यांतून पलीकडे जावयास फारसे प्राचीन खलाशी धजत नसत. आणि उत्तरेस माणसाळलेले अर्धवट रानटी असे थिसली, एपिरस व मॅसिडोनिया वगैरे भाग होते. या भागातूनच होमर व पेरिक्लीस या ग्रीसांच्या काळातील प्रज्ञावंत पुरुषांच्या पूर्वजांच्या टोळ्या ग्रीसमध्ये आल्या होत्या.

पुन्हा या नकाशाकडे नीट पाहा. समुद्राचा ठायी ठायी फाटलेला दंतूर किनारा तुम्हास दिसेल व जमिनीचे चढावही दिसतील. जिकडे तिकडे आखाते, भूशिरे आणि आत शिरलेला सागर. सारी जमीन जणू पर्वत व टेकड्या यांच्यात ठेचाळत आणि हेलकावे खात आहे. समुद्र व जमीन यांच्या या नैसर्गिक अडथळ्यांमुळे ग्रीस देशाचे अलग अलग असे अनेक तुकडे पडले होते. त्या काळात प्रवास व दळणवळण करणे आताच्या मानाने फारच कठीण व दगदगीचे असे. म्हणून प्रत्येक दरी आपापले स्वतंत्र आर्थिक जीवन निर्माण करीत असे व स्वयंपूर्ण होण्याची कोशीश करीत असते. त्या त्या भागात प्रत्येकाचे स्वायत्त सरकार, स्वतःच्या स्वतंत्र संस्था, त्यांची विशिष्ट बोलीभाषा, विशिष्ट धर्म व संस्कृती वगैरेंची निर्मिती होत असे. प्रत्येक भागाचा असा अलग अलग विकास होई. त्या त्या स्वतंत्र भागात एक–दोन मोठी शहरे असत व त्यांच्याभोवती डोंगर उतरणीवरून पसरलेली शेतजमीन असे. ही शेतजमीन संपली की दुसऱ्या स्वतंत्र भागाची शेतजमीन सुरू होई. इयुबा, लोक्रिस, इटोलिया, फोसिस, बोटिया, अकिया, अर्गोलिस, एलिस आणि मेसेनिया

आणि लॅकोनिया, स्पार्टा आणि अत्तिका आणि त्याचे अथेन्स अशी अनेक नगरराज्ये विखुरलेली होती.

आणि अखेरची पुन्हा एकवार दृष्टी फेका आणि त्यातील अथेन्सचे स्थान नीट पाहा. ग्रीसच्या मोठ्या शहरांच्या अति पूर्वेस ते आहे. आशिया मायनरच्या भरभराटलेल्या शहरांशी दळणवळण ठेवण्यासाठी अथेन्सच्या दरवाजातून जाणे सोईचे पडे. आशिया मायनरमधील जुनी शहरे ग्रीस देशांतील विकास पावणाऱ्या शहरांना येणाऱ्या-जाणाऱ्या रहिवाशांच्या द्वारा आपल्या ऐषआरामाच्या वस्तू तर पाठवीतच परंतु आपली संस्कृतीही पाठवीत असत. आशिया मायनरमध्ये एक फार सुंदर बंदर होते, याचे नाव पिरस. समुद्राच्या प्रक्षुब्ध पाण्यापासून शेकडो गलबते या बंदरात निवारा घेऊ शकत. तसेच या शहराजवळ भला मोठा आरमारी ताफाही होता.

ख्रिस्तपूर्व ४९० ते ४७० या काळात स्पार्ट व अथेन्स परस्परांचे हेवेदावे विसरून एक झाली. डरायस व झर्सिस हे ग्रीक लोकांस गुलाम करू पाहात होते. आशियी साम्राज्य वाढवून ग्रीस देशाला आपली वसाहत करू पाहात होते; परंतु एकजूट झालेल्या अथेन्स व स्पार्ट यांच्या सैन्याने त्यांचे हेतू विफल केले. तरुण नवजवान युरोपचा वृद्ध आशियाशी हा सामना होता. या युद्धात स्पार्टने सैन्य पुरविले व अथेन्सने आरमार दिले. युद्ध संपले. स्पार्टने आपल्या सैन्यास रजा दिली. स्पार्टात एक प्रकारची आर्थिक अव्यवस्था माजली. युद्धानंतर सर्वत्र तसा अनुभव येतो. परंतु अथेन्सने मात्र आपल्या आरमाराचे व्यापारी काफिल्यात रूपांतर केले. लढणारी गलबते व्यापार करू लागली. अथेन्स हे प्राचीन जगातील सर्वांत महत्त्वाचे असे व्यापारी शहर बनले. स्पार्टा पुन्हा शेतीभाती करू लागले व एका बाजूस पडले. त्याची वाढ खुंटली. परंतु अथेन्स गजबजले. व्यापार वाढला. बंदर वाढले. शेकडो जातिजमातींचे, नाना वंशांचे लोक येथे एकत्र येत, भेटत, बोलत. विविध मानवांचे हे मीलनस्थान झाले. नाना प्रकारच्या चालीरीती, नाना संस्कृती, नाना विचार यांचा संबंध येऊ लागला. या संबंधांमुळे व स्पर्धांमुळे तुलना करण्याची प्रवृत्ती बळावली. लोक पृथक्करण व विचार करू लागले.

जेथे अशी मिळणी होत असते, तेथे परंपरा, रूढी, समजुती व आग्रही मते ही एकमेकांवर घासून शेवटी काहीच उरत नसते. जेथे हजारो पंथ व संप्रदाय असतात तेथे त्या सर्वांविषयीच एक प्रकारची साशंक वृत्ती व अंधश्रद्धा उत्पन्न होते. बहुधा व्यापारी हे पहिले नास्तिक असावेत. त्यांनी इतके पाहिलेले असे की त्यांची फारशी कशावर श्रद्धा उरतच नसे आणि व्यापाऱ्यांची सर्वसाधारण प्रवृत्ती जगातील लोक ठक तरी असतील नाहीतर मूर्ख तरी असतील असे मानण्याची असल्याने प्रत्येक धर्माबद्दल ते साशंक असत. प्रत्येक



पंथ व संप्रदाय याविषयी ते प्रश्न करीत. या व्यापाऱ्यांत आस्ते आस्ते विज्ञानही वाढू लागले. विनिमयाचे व्यवहार अधिकाधिक गुंतागुंतीचे होऊ लागल्यामुळे गणित वाढले. समुद्रप्रवास अधिक धाडसाचा होऊ लागल्यामुळे खगोलविद्या वाढली. संपत्ती वाढल्यामुळे फुरसत व सुरक्षितता आली आणि त्यामुळे शोधबोधात अनुकूल परिस्थिती उत्पन्न झाली. अशा काळातच तत्त्वज्ञाते जन्मतात. चिंतने-मनने सुरू होतात. आता समुद्रावरून जाताना दिग्दर्शन करा एवढेच ताऱ्यांना विचारून माणसे स्वस्थ बसेनाशी झाली, तर या विश्वाच्या कोड्याचे उत्तर द्या अशीही मागणी ते ताऱ्यांजवळ करू लागले. आरंभीचे ग्रीक तत्त्ववेत्ते खगोलशास्त्रज्ञ होते. ॲरिस्टॉटल म्हणतो, ''मिळालेल्या सिद्धीमुळे ग्रीकांना अभिमान वाटून ते अधिक पुढे जाऊ लागले. इराणजवळ झालेल्या लढ्यानंतर सर्व क्षेत्रांत ग्रीक पुढे सरसावू लागले. संपूर्ण ज्ञानाचा प्रांत ते आपला मानू लागले.'' पूर्वी घडामोडी अतिमानुष शक्तीने होतात असे वाटे. त्याची कारणमीमांसा ते धैर्याने करू लागले. जादूटोणे व धार्मिक कर्मकांड यांचे स्तोम हळूहळू कमी होऊन विज्ञान व त्याद्वारे नियंत्रण यांना स्थान मिळू लागले, तत्त्वज्ञानास आरंभ झाला.

आरंभी हे तत्त्वज्ञान सृष्टिज्ञानात्मक होते. या भौतिक जगाकडे दृष्टी फेकून या सर्व वस्तुजातीचे अंतिम आणि अविच्छेद्य घटक कोणते याचा तपास तत्त्वज्ञानाने सुरू केला. या सर्व विचारांचे पर्यवसान म्हणजे डेमॉक्रिटसचा भौतिकवाद (डेमॉक्रिटस ख्रि. पू. ४६० ते ३६०) डेमॉक्रिटस म्हणे, ''वस्तुत: दोनच तत्त्वे उरतात. अणू व अवकाश.'' ग्रीकांच्या तात्त्विक विचारांतील हा एक महत्त्वाचा प्रवाह होता. प्लेटोच्या काळी हा प्रवाह जरा लुप्त झाल्यासारखा वाटला; परंतु एपिक्युरसच्या काळात पुन्हा वर आला, (एपिक्युरसचा काळ ख्रि. पू. ३४२ ते २७०) आणि या प्रवाहाचे मोठ्या प्रचंड घवघवीत नदीमध्ये ल्युक्रेशियसच्या काळात रूपांतर झाले. (ल्युक्रेशियसचा काळ ख्रि. पू. ९८ ते ५५) परंतु ग्रीकांचे सर्जक विचारदर्शन सोफिस्टांकडून झाले. सोफिस्ट म्हणजे प्रज्ञानाचे फिरते आचार्य. या बाह्य वस्तुमानाकडे पाहण्याऐवजी ते अंतर्मुख होऊन स्वत:चे विचार व स्वत:ची वृत्ती यांचा विचार करीत. हे फार हुशार लोक होते. (उदाहरणार्थ: जॉर्जियास व हिप्पियाज) त्यापैकी काही काही फार खोल विचार करणारे होते. उदा. प्रोटॅगोरस, प्रॉडिकस. आजच्या अर्वाचीन तत्त्वज्ञानात मनाचा व वर्तनाचा असा एकही प्रश्न किंवा उत्तर नाही की जे त्या लोकांना जाणवले नाही व ज्याची त्यांनी चर्चा केली नाही. आजचे नीतिशास्त्र व आजचे मानसशास्त्र, आजचे तत्त्वज्ञान व आजचे जीवनाचे प्रश्न या सर्वांचे पडसाद त्या सोफिस्ट लोकांच्या विवेचनात दिसून येतात. हे सोफिस्ट कोणत्याही गोष्टींबद्दल प्रश्न करीत. धार्मिक व राजकीय विधिनिषेधांची ते पर्वा करीत नसत. ते निर्भयपणे सर्व प्रश्नांची चर्चा करीत.

बुद्धीच्या सिंहासनासमोर प्रत्येक पंथ, संस्था व मत आणून ते उभे करीत. शासनविषयक क्षेत्रात त्यांच्यात दोन पक्ष होते. एक पक्ष रूसोप्रमाणे जे स्वाभाविक आहे ते चांगले आहे, सारी सुधारणा वाईट आहे, असे म्हणे. निसर्गत: सारी माणसे समान असतात; परंतु वर्गनिर्मित संस्थांमुळे माणसांत विषमता उत्पन्न होते. कायदा ही वस्तू बळवंतांनी निर्मिली आहे; दुबळ्यांवर सत्ता चालविण्याचे ते साधन आहे. असे त्यांचे मत होते. आणखी एक पक्ष होता, त्याचे नित्शेप्रमाणे मत होते. निसर्ग हा सद्सताच्या पलीकडे आहे. त्याच्या मते स्वभावत: सारी माणसे असमानच असतात. बळवंतांना मर्यादा घालण्यासाठी, त्यांना रोखण्यासाठी दुबळ्यांनी नीतिशास्त्र निर्मिले आहे. बलशाली होणे हा मानवाचा सर्वोत्कृष्ट सद्गुण होय; मानवाची हीच खरीखुरी इच्छा असते. शासनाच्या सर्व प्रकारांत अत्यंत शहाणपणाचा व स्वाभाविक प्रकार म्हणजे नबाबशाही, अमीरशाही ही होय.

लोकशाहीवर हा जो हल्ला अथेन्समध्ये सुरू झाला त्याचे कारण काय बरे होते? अथेन्स शहरात श्रीमंतांचा एक अल्पसंख्य वर्ग वाढत होता, उदयास येत होता. हा पक्ष स्वत:ला अल्प लोकसत्ताक राज्यपद्धतीचा पुरस्कर्ता म्हणवी. लोकशाहीत राम नाही. लोकशाही कुचकामी आहे, कार्यक्षम नाही असे ते म्हणत. खरे पाहता अथेन्समध्ये फारशी लोकसत्ता नव्हती की जिला नावे ठेवावी. अथेन्सच्या चार लाख लोकांपैकी अडीच लक्ष गुलाम होते. त्यांना कोणत्याही प्रकारचा राजकीय हक्क नव्हता. जे दीड लाख स्वतंत्र नागरिक उरले, त्यांच्यापैकी फारच थोडे सर्वसामान्य सभेला उपस्थित राहात. एक्लेशिया या सर्वसामान्य सभेत राज्याचे सारे धोरण आखण्यात येई, चर्चिले जाई. परंतु जी काही लोकशाही तेथे होती, ती एक प्रकारे परिपूर्ण होती. इतकी परिपूर्ण लोकसत्ता कुठेही आपणास दिसणार नाही. सर्वश्रेष्ठ अधिकारी मंडळाला डिकास्टेरिया (Dikasteria) म्हणत. यात जवळजवळ एक हजार लोक त्यांच्या यादीतून अद्याक्षराप्रमाणे घेतले जात. लोकशाहीचे शत्रू म्हणत की अशी, इतकी परिपूर्ण आणि तरीही विरोधकांच्याच मते तितकीच हास्यास्पद लोकशाही अन्यत्र क्वचित अस्तित्वात असेल. दुसरे म्हणत की इतकी अर्थविहीन लोकसत्ताक राज्यसंस्था क्वचितच कोठे असेल.

ख्रिस्तपूर्व ४०० ते ४३० पर्यंत जी पेलोपानेशियन लढाई एक पिढीभर सारखी चालली होती तीत स्पार्टाने अथेन्सची आरमारी सत्ता शेवटी नष्ट केली. त्यामुळे क्रिटियाज ज्याचा नेता होता अशा अथेन्समधील मूठभर वरिष्ठ वर्ग म्हणू लागला की, लोकशाही कुचकामी आहे. लोकशाहीमुळे आपणास युद्ध यशस्वीरीत्या करता आले नाही. हे श्रीमंत अथेनियन स्पार्टातील वरिष्ठ वर्गाच्या सत्तेची गुप्त रीतीने स्तुती करीत. अथेन्समधील अल्पसंख्यांकांची सत्ता असावी असे म्हणणाऱ्यांमध्ये बरेचसे पुढारी हद्दपार केले गेले. परंतु जेव्हा अथेन्स



स्पार्टाला शरण गेले व शेवटी तह झाला तेव्हा त्या तहात अशी एक अट होती की हद्दपार झालेले बडे लोक परत बोलविले जावेत. ते अथेन्समध्ये आले व त्यांनी लगेच वरिष्ठ वर्गाचे बंड पुकारले. क्रिटियाज त्यांचा पुढारी होता. राष्ट्राची दुर्दशा करून टाकणाऱ्या लोकशाही सत्तेविरुद्ध त्यांचा हा उठाव होता. परंतु श्रीमंतांची ही क्रांती अपेशी झाली. क्रिटियाज रणांगणी धारातीर्थी पडला.

हा क्रिटियाज सॉक्रेटिसचा शिष्य होता; प्लेटोचा चुलता होता.

✦✦

## २. सॉक्रेटिस

प्राचीन ग्रीक शिल्पकलेचे जे अवशेष मोडक्या तोडक्या अवस्थेत आपणाकडे आहेत, त्यात सॉक्रेटिसचाही अर्धपुतळा आहे. त्या पुतळ्यावरून पाहता सॉक्रेटिस फार कुरूप होता असे दिसते. तत्त्वज्ञानी तसे फारसे सुंदर नसतातच; परंतु तत्त्वज्ञान्यांचे हे जे अल्पस्वरूप सौंदर्य तेही सॉक्रेटिसजवळ नव्हते. टक्कल पडलेले डोके, भले मोठे वाटोळे तोंड, टक लावणारे खोल डोळे, रुंद व फुगलेले नाक जे नाक तत्त्वज्ञानविषयक सर्व संग्रहाचा जणू पुरावा देत होते, अशा या स्वरूपावरून हे डोके अति महान् व दिगंत गाजलेल्या तत्त्वज्ञान्याचे नसून एखाद्या हमालाचे आहे असे वाटते. परंतु या चेहऱ्याकडे पुन्हा पाहा. या ओबडधोबड दगडांतूनही ती मानव्याने ओथंबलेली दया, ती अकृत्रिम सरलता व सहजता, तो साधेपणा ही उमटून दिसतात. या गुणांमुळेच हा निरहंकारी साधासुधा तत्त्वज्ञानी अथेन्समधील तरुणांचा अत्यंत आवडता आचार्य होऊ शकला. सॉक्रेटिसची फारच थोडी माहिती आपणास आहे. तरीही त्या पंत प्रवृत्तीच्या प्लेटोपेक्षा सॉक्रेटिस कितीतरी अधिक जवळचा व अधिक परिचित वाटतो; त्या संकोची व अबोल विद्वान ॲरिस्टॉटलपेक्षा आपलासा वाटतो. अडीच हजार वर्षे उलटून गेलेली असली तरीही त्याची ती बेढब मूर्ती आपल्या डोळ्यांसमोर स्पष्ट उभी राहते. तोच सुरकुतलेला कुडता, त्याचे ते बाजारपेठांतून निवांतपणे भ्रमण करणे, राजकीय घोटाळ्यांनी न गोंधळता शांतपणे तरुणांना आपल्या भोवती जमवून चर्चा करणे, शिकवणे, ते प्रतिपक्षाला कुंठित करणे, एखाद्या मंदिराच्या छायेत बोलत उभे राहणे, तेथे लोकांना आकर्षून त्यांना आपापल्या शब्दांच्या व्याख्या करायला लावणे हे सारे करणारी ती महान मूर्ती आपणासमोर आजही इतक्या प्रदीर्घ काळातूनही स्वच्छ उभी राहते.

सॉक्रेटिसच्या भोवती संमिश्र असा मेळावा असे. सर्व प्रकारचे तरुण त्यात असत. या भिन्न भिन्न प्रवृत्तींच्या तरुणांनी सॉक्रेटिसला युरोपियन तत्त्वज्ञान निर्माण करायला मदत केली. प्लेटो, आल्सिबिआडीस यांच्यासारखे श्रीमंत तरुणही त्यात असत. अथेन्समधील

लोकशाहीचे सॉक्रेटिसने केलेले उपहासात्मक पृथक्करण त्यांना फार आवडे. तसेच ॲंटिस्थेनिसासारखे समाजवादी त्या घोळक्यात असत. त्यांना सॉक्रेटिसचे बेफिकीर दारिद्र्य व फकिरी फार आवडे. त्यांनी या फकिरीचा धर्मच बनविला. ॲरिस्टिप्पसासारखे एक-दोन अराजकवादीही तेथे असत. या अराजकवादी तरुणांना असे वाटे की सरकार नसावे. कोणी राजा ना प्रजा. शास्ता ना शासित. स्वामी ना दास. ज्यात सारे सॉक्रेटिससारखे स्वतंत्र व निश्चिंत होतील असा समाज असावा. जे जे प्रश्न आजच्या समाजाला भंडावीत आहेत, ते सारे प्रश्न सॉक्रेटिसभोवती होते. त्या तरुणांचा अखंड वादविवाद त्या प्रश्नांविषयी सुरू असे. आजचे तरुण ज्या ज्या प्रश्नांविषयी भवति न भवति करीत बसतात ते सारे प्रश्न त्या प्राचीन विचारवंतांच्या मंडळात चर्चिले जात असत. त्या सर्वांना वाटे वाद-संवादाशिवाय जीवन म्हणजे मानवास न शोभणारे जीवन. सामाजिक विचारसरणीतील प्रत्येक संप्रदायाचा तेथे प्रतिनिधी होता. या सर्व विचारसरणीचे कदाचित तेथे उगमही झालेले असावेत.

सॉक्रेटिस कसा राही हे फारसे कोणाला माहीत नसे. तो काम करीत नसे व उद्याची कधीही पर्वा करीत नसे. जेव्हा जेव्हा त्याचे शिष्य त्याला 'जेवायला या' असे प्रार्थीत तेव्हा तेव्हा तो जेवे. त्यांना त्याची संमती आवडत असावी. त्याची शरीरयष्टी धष्टपुष्ट होती. घरी त्याचे नीटसे स्वागत होत नसावे. कारण तो पत्नीची व मुलाबाळांची काळजी घेत नसे. त्याच्या पत्नीच्या दृष्टीने तो एक निरुपयोगी उडाणटप्पू होता. झांटिपी म्हणे की, हा कुटुंबाला भाकर आणून देत नाही, उलट त्यांची अप्रतिष्ठा मात्र करतो. सॉक्रेटिसप्रमाणेच झांटिपीलाही खूप बोलायला हवे असे. त्यांचेही संवाद झाले असावेत. परंतु प्लेटोने ते नमूद केले नाहीत. तो कसा विसरला देव जाणे. तरीही झांटिपीचे सॉक्रेटिसवर प्रेम होते आणि सॉक्रेटिस सत्तराव्या वर्षी निधन पावला तरी तिला वाईट वाटल्याशिवाय राहिले नाही.

सॉक्रेटिसला त्याचे शिष्य इतके पूज्य का मानीत? तो तत्त्वज्ञानी होताच परंतु तो सामान्य माणूसही असावा. लढाईत त्याने आल्पिबिआडीसचे प्राण वाचविले होते. तो इतरांबरोबर नि:संकोचपणे परंतु प्रमाणात पेलेही झोकी. परंतु त्याच्या मित्रांना सॉक्रेटिसचा सर्वात आवडलेला गुण म्हणजे त्याचा स्वत:च्या शहाणपणासंबंधीचा विनय. तो म्हणे, ''मजजवळ शहाणपण नाही, परंतु शहाणपण शोधावे असे मला फार वाटते. शहाणपणावर माझे प्रेम आहे.'' शहाणपणाचा धंदा करणारा तो नव्हता. शहाणपणाची ओळखदेख करून घेऊ पाहणारा असा तो होता. डेल्फी येथील देवीने, 'सर्वांत शहाणा सॉक्रेटिस' असा कौल दिला होता. सॉक्रेटिस म्हणे, ''अंतिम सत्याचा शोध लावणे कठीण आहे. ते तत्त्व अज्ञात आहे असे जे मी म्हणतो ते एकंदरीत यावरून बरोबर आहे.'' हा अज्ञेयवाद सॉक्रेटिसच्या तत्त्वज्ञानाचा आरंभ होता. सॉक्रेटिस म्हणे, ''मी फक्त एकच गोष्ट जाणतो व



ती म्हणजे मला काहीच कळत नाही.'' जेव्हा मनुष्य संशय घेऊ लागतो तेव्हाच तत्त्वज्ञानाचा जन्म होतो. विशेषत: आजपर्यंत ज्या गोष्टींवर आपण प्रेमाने विश्वास ठेवीत होतो, आपण ज्या गोष्टी स्वयंसिद्ध मानीत होतो, आणि ज्या सिद्ध करण्याची गरज नाही असे आपण समजत होतो त्यांचेविषयीच आपण जेव्हा साशंक होतो, तेव्हा तत्त्वज्ञान संभवते. मनाला प्रिय वाटणाऱ्या धारणा प्रमाण केव्हा बनल्या कुणास ठाऊक? आपल्याच एखाद्या सुप्त इच्छेने तर आपल्या विचारांना, आपल्या तत्त्वांना जन्म नसेल ना दिला? विचारांच्या वस्त्राने नटून आलेली आपली ही वासनाच तर नसेल ना? जेव्हा मन स्वत:भोवतीच फिरून पाहू लागते, स्वत:लाच सर्व बाजूंनी नीट तपासू लागते तेव्हाच खरे तत्त्वज्ञान आकार घेऊ लागते. तोपर्यंत खऱ्या तत्त्वज्ञानाचा जन्म होत नाही. सॉक्रेटिस म्हणे, ''तू स्वत:ला जाणून घे.''

सॉक्रेटिसच्या पूर्वी ग्रीक तत्त्वज्ञानी झाले नव्हते असे नाही. थेलीस व हिरॅक्लिटस यांच्यासारखे बाके लोक, पार्मेनायडिस व टूलिया येथील झीनो यांच्यासारखे सूक्ष्म तत्त्वज्ञानी, पायथागोरस व एम्पिडोक्लिस यांच्यासारखे द्रष्टे होऊन गेले होते; परंतु हे सारे बहुधा भौतिक तत्त्वज्ञानी होते. वस्तूंच्या बाह्य स्वरूपासाठी त्यांची सारी आटापीट होती. ते एक प्रकारे बहिर्दृष्टी होते. या भौतिक सान्त जगातच त्यांच्या विचारांचा सर्व खटाटोप होता. या मर्त्य जगाचेच नियम व घटक ते शोधू पाहात होते. ज्याचे मोजमाप होऊ शकेल अशा जगातच त्यांचे विचार गढलेले होते. सॉक्रेटिस म्हणे, ''हे सारे ठीक आहे परंतु या झाडांपेक्षा व दगडांपेक्षा, इतकेच नाही तर या अनंत ताऱ्यांपेक्षाही अनंत पटींनी अभ्यासार्ह व मननार्ह असा एक महत्त्वाचा विषय आहे, कोणता बरे तो? मनुष्याचे मन, मानव म्हणजे काय? त्याला काय होणे शक्य आहे?''

मानवी आत्म्यात डोकावीत सॉक्रेटिस हिंडू फिरू लागला. ज्या ज्या गोष्टी मनुष्य गृहीत धरून चालला होता त्यांचे स्वरूप उघड करू लागला. ज्या ज्या गोष्टी संशयातीत समजल्या जात होत्या, त्यांच्याविषयी प्रश्न करू लागला. कोणी मनुष्य जर एकदम न्यायाविषयी बोलू लागला तर सॉक्रेटिस विचारी, ''न्याय म्हणजे काय?'' हे अमूर्त शब्द वापरले खरे, परंतु त्यांचा अर्थ काय? जीवनमरणाचे प्रश्न जे शब्द उच्चारून तुम्ही झटपट सहज सोडवता, त्या शब्दांचा खरा अर्थ कधी पाहिला होता का? मान, स्वाभिमान, सद्गुण, नीती, देशभक्ती वगैरे शब्द आपण उच्चारतो पण त्यांचे अर्थ काय? 'तुम्ही स्वत:' म्हणजे तरी काय? काय तुमचे स्वरूप? अशा प्रकारचे नैतिक व मनोवैज्ञानिक प्रश्न विचारण्याचे सॉक्रेटिसला फार आवडे. या प्रश्नोत्तरांच्या पद्धतीला 'सॉक्रेटिसी पद्धत' असे नाव पडले. जे शब्द तुम्ही वापरता, उच्चारता, त्यांची आधी बिनचूक व्याख्या करा; नीट

स्वच्छ विचार करा, पृथक्करण करा; मोघम अघळपघळ बोलणे नको, असे सॉक्रेटिस सांगे व प्रतिपक्षी, ते वाद करणारे सॉक्रेटिसावर रागावत, खिजत, चिडत. ते म्हणत, ''सॉक्रेटिस स्वत: उत्तर देतो त्यापेक्षाही अधिक आमच्यापासून अपेक्षितो आणि माणसांना पूर्वीपेक्षा अधिक बुचकळ्यात पाडतो.'' ते काही असो, मानवासमोर उभ्या असणाऱ्या अत्यंत गहन अशा दोन प्रश्नांना तरी त्याने निश्चित उत्तरे दिली आहेत. तत्त्वज्ञानाला सॉक्रेटिसने दिलेली ही पुंजी होय. कोणते हे दोन प्रश्न? एक म्हणजे सद्‌गुणाचा अर्थ काय? दुसरा प्रश्न उत्कृष्ट शासनपद्धती कोणती?

त्या पिढीतील तरुण अधिनीअन मंडळींस या दोन प्रश्नांहून अधिक महत्त्वाचे प्रश्न क्वचितच असतील, सोफिस्ट लोकांनी या तरुणांची ऑलिम्पिअसच्या देवदेवतांवर एके काळी असलेली श्रद्धा नष्ट केली होती. तशीच स्थानिक असंख्य देवादिकांच्या भीतीमुळे व्यापक प्रमाणावर लादल्या गेलेल्या नीतीवरची त्यांची श्रद्धाही सोफिस्टांनी पार नष्ट केली होती. जोपर्यंत कायद्याच्या कक्षेत मनुष्य आहे तोपर्यंत तो कसाही वागला म्हणून काय झाले? मला कोण विचारणार, मी वाटेल ते करीन, अशी एक व्यक्तिनिष्ठ घमेंडी, हम करेसो वृत्ती अथिनिअन तरुणांत दिसू लागली. अथिनिअन लोकांच्या चारित्र्यात, वर्तनात एक प्रकारची परस्परांपासून दुरावा निर्माण करणारी शिथिलता आली आणि म्हणूनच अत्यंत कठोरपणे शिस्तीने वाढवलेल्या स्पार्टापुढे स्वच्छंदी अथिअनांचा पाडाव झाला. नीतीची ही दशा व राज्यकारभाराची तर त्याहून दुर्दशा अथेन्समधील लोकशाही म्हणजे वासनांच्या हातातील खेळणी बनलेल्या लोकांची सत्ता. वाटेल त्या गोष्टींनी वाटेल तेव्हा बहकणाऱ्या व भडकणाऱ्या अशा असंयमी लोकांची सत्ता. अथेन्समधील सरकार वादविवादोत्तेजक मंडळाच्या जणू हाती होते. सेनापती आज निवडले, उद्या पुन्हा त्यांना काढावे, परवा त्यांना फाशी द्यावे असा प्रकार. साधे-भोळे शेतकरी व दुकानदान जे मनात येईल ते निर्णय घेत. नावांच्या आद्याक्षराप्रमाणे पाळीपाळीने देशातील न्यायमंडळाचे सभासद निवडले जात. पाळी आली की चालला राज्यकारभार हाकायला. पाळी म्हणजे पात्रता. अशा परिस्थितीत नवीन व स्वाभाविक अशी नीती कशी वाढणे शक्य होते? शासनसंस्था वाचविणे कसे शक्य होते?

या प्रश्नांना सॉक्रेटिसने दिलेल्या उत्तरांमुळेच त्याला मृत्युदंड झाला व अमृतत्वही लाभले. त्याला देहदंड झाला. पूर्वीच्या अनेक ईश्वरावरील देवदेवतांवरची श्रद्धा पुन्हा प्रस्थापित करण्याचे जर सॉक्रेटिसने प्रयत्न केले असते तर जुन्या पिढीने त्याचा गौरव केला असता. आपल्या मुक्तात्म्यांची यादी घेऊन जर तो पवित्र मठातून व मंदिरांतून जाता व तेथे 'आपल्या पूर्वजांच्या या देवदेवतांसमोर यज्ञ करा' असे त्या अनुयायांना बजावता तर वृद्ध



मंडळींनी सॉक्रेटिसचा सन्मान केला असता. परंतु सॉक्रेटिसास माहिती होते की असे करणे व्यर्थ आहे. ते आत्मघातकीपणाचे होईल. ती पिछेहाट होईल. त्याला वाटले की असे केल्याने आपण थडगी ओलांडून पुढे जाण्याऐवजी, मागे मेलेल्यांच्याच सहवासात अडकत राहू. सॉक्रेटिसाजवळ स्वत:ची जिवंत धर्मश्रद्धा होती. एका परमेश्वरावर त्याचा विश्वास होता आणि मरणाने माझे सारेच नष्ट होते असे नाही असे तो आपल्या विनयशील पद्धतीने म्हणे.

सॉक्रेटिस हे पक्के जाणून होता की, बदलणाऱ्या धार्मिक तत्त्वज्ञानाच्या या अस्थिर पायावर नीती उभारणे योग्य नाही. धर्मतत्त्वाचा आधार न घेता स्वतंत्रपणे नीतिशास्त्र उभारता नाही का येणार? जी नीती नास्तिकही नाकारणार नाही व आस्तिकही नाकारणार नाही अशी नीती जर देता आली तर किती छान होईल ! मग जुन्या धर्मकल्पना जावोत, नव्या येवोत, परंतु स्वेच्छेने, सहकार्याने जगू इच्छिणाऱ्या व्यक्तींना समाजाचे शांतताप्रिय नागरिक बनविणारी दृढ व स्थिर अशी नीती असल्यामुळे समाज विस्कळीत होणार नाही. स्वेच्छाचारी माणसांना संयमी व विवेकी नागरिक बनवणारी नीती अभंगच राहील. कारण ती धर्मनिरपेक्ष अशी असेल.

बुद्धीला पटते ते चांगले. शहाणपणाने वागणे म्हणजे सदाचारी व सद्‌गुणी होणे असे म्हटले तर काय बिघडले? अरे, आपले हित व कल्याण नीट पाहा, तुमच्या कर्माचे दूरवर दृष्टी ठेवून काय परिणाम होतील ते नीट ध्यानात घ्या. आपापल्या वासनाविकारांचे नीट निरीक्षण- परीक्षण करून त्यांच्यात मेळ व सुसंबद्धता निर्माण करा. जीवनातील स्वत:ला मारू पाहणारा गोंधळ दूर करून तेथे हेतूमय व अर्थपूर्ण अशी सर्जक सुसंगतता निर्माण करा असे माणसांस सांगितले व शिकवले तर? जी नीती अडाणी लोकांना देवदेवता निर्मून व त्यांची भयभीती वा कृपाप्रसाद दाखवून, स्वर्गनरकांच्या कल्पनांतून द्यावी लागते, ती नीती वरील वैचारिक मार्गाने बुद्धिप्रधान, तर्ककुशल अशा सुशिक्षितांस देता येईल. देवाला न मानणारेही बुद्धीला मानत असल्यामुळे ही बुद्धीप्रधान नीती अंगीकारतील. पाप म्हणजे तरी काय? मूर्खपणा, अर्धवट दिसणे, चूक होणे म्हणजेच पाप नाही का? अशिक्षिताजवळ ज्याप्रमाणे प्रक्षुब्ध वासनाविकार असतात, त्याप्रमाणे ते सुशिक्षितांजवळही असतात. समाजात वागताना अशा भडकणाऱ्या भावना शोभत नाहीत; परंतु त्या असतात तर खऱ्या. मग विचारवंत काय करतो? तो विचाराने आपल्या बेबंद वासना आवरतो. विकारांच्या आहारी जाऊन पशू होण्यापासून स्वत:ला सावरतो.

सुशिक्षित व अशिक्षित, विचारी व अविचारी यातील भेद तो हाच. ज्या समाजातील व्यवस्था नीट बुद्धिपूर्वक व विचारपूर्वक चालली आहे, ज्या समाजातील शासनसंस्था